प्रकरण क्र. ७०

**विषय** :- महाराष्ट्र महानगरपालिका,अधिनियमाचे कलम २३४ अन्वये ठाणे महानगरपालिका हद्दीत सार्वजनिकउत्सवाच्या व समारंभाच्या प्रसंगी रस्त्यावर तात्पुरते उभारण्यात येणारे मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम यामुळे परिसरातील नागरिकांच्या मुलभूत अधिकारांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेणे. तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण न होऊ देणे, त्याबाबत नियमन (Regulation) करण्यासाठीची **कार्यपध्दती** ठाणे महानगरपालिकेने **मार्गदर्शक तत्त्वे - २०१५(सुधारित)** अन्वये तयार केलेली असून त्या अनुषंगाने धोरण आखणेबाबत...

**संदर्भ** :- १) ठा.म.पा. ठराव क्र. १११ दि. १८.०८.२००५ सार्वजनिक उत्सवाच्या दरम्यान उभारण्यात येणाऱ्या मंडपाकरिता ना हरकत दाखला देणेसाठी नियमावली निश्चित करणे.

२) सुधारित कार्यालयीन आदेश क्र. ठामपा/पअ/आयुक्त/२ दि.२०.०८.२०११

३) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३४ अन्वये विविध सण, उत्सव साजरे करण्यासंबंधी निश्चित केलेली मार्गदर्शक तत्त्वे दिनांक २६.०७.२०१२

४) केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाचे ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० दिनांक १४.०२.२०००

५) मा.उच्च न्यायालय पीआयएल १७३/१० सह सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१२४/२०१४ चा आदेश दिनांक १३.०३.२०१५ व दिनांक २४.०६.२०१५

६) महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र. याचिका २०१५/सं.क्र. ८७८/. नवि-३४ दि.०१.०७.२०१५

७) महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र. याचिका २०१५/सं.क्र. ८७८(१)/नवि-३४ दि.०६.०७.२०१५

८) जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र. गृह/का-१/टे-४/ध्वनी प्रदूषण/वशी-०७/१५ दि.०८.०७.२०१५

ठाणे महानगरपालिका ठराव क्र. ९२० दिनांक :२८/८/२०१५

**ठराव :-**

संदर्भांकित विषयान्वये मा. उच्च न्यायलयाच्या दि. १३.०३.२०१५ रोजीच्या आदेशान्वये प्रशासनाने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३४ अन्वये तयार केलेले २०१५ चे मार्गदर्शक तत्त्वे (सुधारित) यास धोरण स्वरुपात मंजुरी देण्यासाठी मा. महासभेकडे सादर केलेले आहेत.

सदर विषयावर चर्चा करताना सदस्यांनी मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेले धोरण प्रशासनाने विचारात घ्यावे असे सूचित केले.

त्याअनुषंगाने मुंबई महानगरपालिकेने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन निश्चित केलेल्या धोरणाच्या धर्तीवर सार्वजनिक उत्सव, समारंभाच्या वेळी रस्त्यावर उभारण्यात येणारे मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम तात्पुरत्या स्वरुपात उभारणीस परवानगी देण्यासाठी ठाणे शहराची भौगोलिक परिस्थिती विचारात घेता योग्य त्या फेरबदलासह सुधारित धोरण पुढीलप्रमाणे आखण्यात आलेले आहे.

प्रदुषण नियंत्रण कक्ष
आ क्र ५९९
आ दि ५/०९/२०१५
जा. दि

**<u>विषय</u> :-** सार्वजनिक उत्सव व समारंभाच्या वेळी रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात येणारे मंडप व इतर बांधकामे यांना परवानगी देण्याबाबतचे धोरण

**१. प्रस्तावना**

ठाणे हे महानगर असून, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणमधील एक नागरी शहर आहे. ठाणे शहराची लोकसंख्या अंदाजे २० लाख असून, त्याच्या पश्चिम सीमेस येऊर डोंगर असून पूर्व सिमेस विस्तीर्ण खाडी किनारा आहे. या भौगोलिक स्थितीमुळे ठाणे शहराचा विस्तार होऊ शकत नाही. त्यामुळे मोठया प्रमाणात शहरामध्ये दाट लोकवस्ती आहे. शहरामध्ये मोकळया जागांचे प्रमाण कमी आहे. ठाणे शहरात फार पूर्वीपासून गणपती, नवरात्रौत्सव, बकरी ईद इत्यादी सर्व धर्मीय सण साजरे केले जातात. सदर सण, धार्मिक उत्सव साजरे करण्याची ऐतिहासिक परंपरेमुळे ठाणे महानगरपालिका सदर उत्सव साजरे करण्यासाठी रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात मंडप व इतर बांधकाने उभारण्यासाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २३४ अन्वये मा. पोलीस आयुक्तांच्या सहमतीने अटीशर्तीवर कायदेशीर परवानगी देत असते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २३४ खालीलप्रमाणे आहे.

**आयुक्तास उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर मंडप इत्यादी उभारण्यास परवानगी देता येईल.**

**(ज्या क्षेत्रासाठी पोलीस आयुक्ताची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रासाठी पोलीस आयुक्ताच्या किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या आणि अन्यत्र जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या सहमतीने) आयुक्तास, कोणत्याही रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम तात्पुरते उभारण्यासाठी लेखी परवानगी देता येईल.**

त्याअनुषंगाने प्रचलित धोरणानुसार सार्वजनिक उत्सव व समारंभाच्या वेळी रस्त्याच्या काही भागावर तात्पुरत्या स्वरुपात मंडप व इतर बांधकामे उभारण्यासाठी प्रभाग समिती निहाय सहाय्यक आयुक्त त्यांना दिलेल्या मा. आयुक्त यांचे अधिकार वापरुन परवानगी देत आहेत.

मा. उच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन क्र. १२४/२०१० जनहित याचिका क्र. १७३/२०१०, सिव्हील ॲप्लीकेशन क्र. २२६/२०१३ अन्वये दि. १३.०३.२०१५, दि. २४.०६.२०१५ व दि. १७.०७.२०१५ रोजी दिलेल्या आदेशामध्ये नमूद केले आहे की, आयुक्त हे कलम २३४ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात येणाऱ्या मंडपांना किंवा इतर बांधकामांना अटी शर्तीवर उदा. सदर तात्पुरत्या स्वरुपातल्या बांधकामामुळे वाहनांच्या वाहतुकीस तसेच पादचारी हालचालीस अडथळा होता कामा नये याप्रमाणे मंजुरी देण्यास सक्षम अधिकारी आहेत. रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य तात्पुरत्या स्वरुपातील बांधकामांना परवानगी देण्यासाठी सर्व महानगरपालिकांनी धोरण तयार करावे.

मा. उच्च न्यायालयाने दि. १७.०७.२०१५ रोजीच्या आदेशामध्ये असेही नमूद केले आहे की, तात्पुरत्या स्वरुपातले मंडप वा इतर बांधकामे यांना रेल्वे स्टेशन, सार्वजनिक बस स्थानक, रिक्षा स्टॅण्ड, टॅक्सी स्टॅण्ड, मोठया हॉस्पिटल नजीकचा परिसर, शैक्षणिक संस्था येथे परवानगी देताना आयुक्त याने सर्व आवश्यक त्या बाबी काळजीपूर्वक विचारात घेतल्या पाहिजे. जर सर्व बाबी विचारात घेतल्यानंतर आयुक्तांचे असे मत झाले की, सदर परिसरात तात्पुरत्या स्वरुपात मंडप अथवा इतर बांधकामांना मंडप उभारण्यास परवानगी दिल्यानंतर सदर परिसरात वाहनांच्या वाहतुकीला अडथळा येणार नाही. तसेच नागरिक, पादचारी यांच्या हालचालीस अडथळा येणार नाही अशा परिस्थितीत न्यायालयाचा सदर आदेश उपरोक्त परवानगी देण्याचा आयुक्तांच्या अधिकारावर बंधने लादत नाहीत. महापालिका आयुक्तांना वरील नमूद अधिकार संदर्भात सदर आदेशाच्या परिच्छेद ८ मध्ये नमूद केलेल्या दिशानिर्देशांच्या सापेक्ष राहून अशी परवानगी देण्यात यावी. वरील उदाहरणे फक्त नमुन्यादाखल दिलेली आहेत.

मा. उच्च न्यायालयाने दि. १३.०३.२०१५ परिच्छेद ८ मध्ये असे ही नमूद केलेले आहे की, आयुक्तांनी रस्त्यावर सार्वजनिक उत्सव व समारंभाच्या वेळी तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात येणारे मंडप व इतर बांधकामे यांना मंजुरी देण्याच्या अधिकाराचा वापर हा पोलीस आयुक्तांची सहमती घेऊन करावा. उपरोक्त अधिकाराचा वापर जर पोलीस आयुक्तांच्या सहमतीने केला नसेल तर, तो न्यायिक दृष्टया कायद्याच्या तरतूदीनुसार होणार नाही.

सदर बाबींच्या अनुषंगाने नागरिकांच्या चलनवलनबाबतच्या मुलभूत अधिकारांवर विपरीत परिणाम होणार नाही. तसेच वाहतूकीस व पादचारी चलनवलनास अडथळा होणार नाही त्या दृष्टीने सदर धोरण तयार करण्यात आलेले आहे.

२. **धोरण :-**

- महाराष्ट्र महानगरपालिका कलम २३४ अन्वये रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात बांधकामे उभारण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती निर्देशित करण्यात आलेली आहे.

- ठाणे महानगरपालिकेच्या रस्त्यावर, सार्वजनिक सण, समारंभ, तात्पुरत्या स्वरुपातले मंडप व इतर बांधकामे करुन साजरे करण्यासाठी, पोलीस आयुक्तांनी प्राधिकृत केलेल्या संबंधित पोलीस स्टेशनची आणि शहर वाहतूक शाखेचा ना हरकत दाखला बंधनकारक राहिल.

- सार्वजनिक उत्सवाच्या ३० दिवस अगोदर अर्ज संबंधित सहाय्यक आयुक्तांकडे अर्जदार संस्थेने केला पाहिजे. सहाय्यक आयुक्त नवीन धोरणातील तरतुदीनुसार अर्जाची छाननी करतील. सहाय्य आयुक्तांचा निर्णय हा अंतिम असेल.

१. संबंधित प्रभागाचे सहाय्यक आयुक्त हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २३४ अन्वये तात्पुरत्या स्वरुपातले मंडप किंवा इतर बांधकामे यांना परवानगी देतील.

२. सदर परवानगी देण्याच्या अगोदर न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्तावित केलेले तात्पुरत्या स्वरुपातले मंडप किंवा इतर बांधकाम यांचा स्थळदर्शक नकाशा, तात्पुरत्या बांधाकामाची लांबी, रुंदी, उंची दर्शविणारा आराखडा पोलीस आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या पोलीस स्टेशनची आणि शहर वाहतूक शाखेचा ना हरकत दाखला प्राप्त झाल्यानंतरच परवानगी देण्यात यावी.

३. मागील वर्षी ज्या अर्जदार संस्थेला मंडप/स्टेज इ. उभारण्यासाठी ज्या जागेवर परवानगी देण्यात आली होती. त्याच जागेवर परवानगी नवीन धोरणाच्या तरतुदीनुसार देण्यात येईल. परंतु प्रशासकीय आवश्यकतेनुसार ठाणे महानगरपालिका सदर बाबीमध्ये योग्य तो बदल करु शकते.

४. ठाणे महानगरपालिकेने परवानगी दिल्यानुसारच मंडप व इतर बांधकामे तात्पुरत्या स्वरुपात उभारणे संबंधित अर्जदार संस्थेवर बंधनकारक आहे. परवानगी व्यतिरिक्त संबंधित अर्जदार संस्थांनी मंडप व इतर बांधकामे तात्पुरत्या स्वरुपात इत्यादी उभारल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त हे पोलीस अधिकाऱ्याच्या मदतीने अतिरिक्त बांधकाम काढून टाकतील. तसेच संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. महानगरपालिकेने दिलेल्या सूचनेनुसार तात्पुरत्या स्वरुपातील मंडप व इतर बांधकामे नसल्यास सदर संरचना सहाय्यक आयुक्त पूर्वसूचना न देता काढून टाकण्यास सक्षम असतील.

५. मंडपाची उंची ही ३० फुटापेक्षा जास्त असता कामा नये. मंडपाची उंची २५ फुटापेक्षा जास्त असल्यास अर्जदाराने रचना स्थिरता प्रमाणपत्र (Structural Stability Certificate) सादर करणे बंधनकारक आहे.

६. अर्जदाराने अग्निशमन विभागाचा ना हरकत दाखला घेणे व त्यामध्ये नमूद केलेल्या आवश्यक अटींची पूर्तता संबंधित अर्जदारांनी करणे बंधनकारक आहे.

७. संबंधित अर्जदार संस्थेस मंडप/स्टेज इ. उभारणी करण्यासाठी रस्त्यावर खड्डे खणू नये. मंडप किंवा इतर तात्पुरत्या बांधकाम परिसरात खड्डे आढळल्यास रु. २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार फक्त) प्रति खड्डा याप्रमाणे दंड आकारण्यात येईल. तसेच कोणत्याही ठिकाणचा सिमेंट काँक्रीट रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर खोदाई करण्याकरिता परवानगी देण्यात येणार नाही. अशा ठिकाणी मंडप घालावयाचे झाल्यास वाळूने भरलेल्या ड्रमवर मंडप/स्टेज याकरिता आवश्यक असणारे बांबू रोवून त्यापासून अथवा पूर्वनियोजित व्यवस्थापनाप्रमाणे मंडप/स्टेज याकरिता बांबू रोवण्यात यावेत. रस्ते/सार्वजनिक खोदाई करुन मंडप/स्टेज इ. उभारणी केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अर्जदार संस्थेवर रस्ते अनाधिकृतपणे खोदाईबाबत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

८. संबंधित अर्जदार संस्थेने विद्युत व पाणी व्यवस्था स्वत: करावयाची आहे. आवश्यक असल्यास स्वतंत्र मीटर घ्यावे. सार्वजनिक उत्सवाकरिता आवश्यक विद्युत जोडणी महापालिकेच्या कोणत्याही रस्त्यावरील विद्युत खांबातून घेता येणार नाही असे आढळून आल्यास संबंधित अर्जदार संस्थेवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

९. सार्वजनिक सण, उत्सव यासाठी निषिध्द केलेली वस्तू अथवा कोणत्याही ब्रॅण्डची जाहिरात करण्यास संबंधित अर्जदारास परवानगी मिळणार नाही. अर्जदार संस्थेला उत्सव मंडपामधील प्रत्येक जाहिरातीसाठी रु. १२५/- शुल्क आकारण्यात येईल. तसेच १०० मीटर पर्यंतच्या जाहिरातीसाठी रु. १०१/- शुल्क आकारण्यात येईल.

१०. अर्जदार संस्थेने सक्षम प्राधिकरणाने निर्देशित केलेली ध्वनी पातळी नियंत्रित राखण्याबाबत आवश्यक त्या सर्व मानकांची पूर्तता करावी.

११. ज्या प्रयोजनासाठी उत्सवाच्या जागेवर परवानगी प्राप्त झाली आहे त्याव्यतिरीक्त इतर कामासाठी जागेचा वापर करु नये.

१२. ज्या कालावधीपर्यंत उक्त प्रयोजनासाठी परवानगी दिलेली आहे, त्या नंतर त्वरित सदर तात्पुरते बांधकाम अर्जदाराने स्वत:च्या खर्चाने व स्वत:च्या जोखीमेवर काढून टाकावे. परवानगीमध्ये नमूद केलेल्या कालावधीपेक्षा जास्त वाढीव कालावधीची परवानगी देण्यात येणार नाही.

१३. ठाणे महानगरपालिकेस उक्त परवानगी कालावधीनंतर जागा अर्जदाराने स्वच्छ व नुकसान विरहित हस्तांतरीत करावयाची आहे.

१४. ठाणे महानगरपालिकेच्या ठरावानुसार उत्सव समारंभाच्या वेळी रस्त्यावर उभारण्यात येणारे मंडप इतर बांधकामावर शुल्क आकारण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत स्वीकारण्यात आलेले शुल्क पुन्हा परत करण्यात येणार नाही.

१५. तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात आलेल्या बांधकामाच्या संरचनेच्या आतमध्ये कोणत्याही स्टॉलला परवानगी मिळणार नाही.

१६. ठाणे महानरपालिकेच्या ठरावानुसार जागेचे भाडे व इतर सुविधांचे शुल्क संबंधित अर्जदाराकडून वसूल केले जातील.

निर्देशांचे पालन संबंधित अर्जदार संस्थांनी करणे बंधनकारक राहिल.

१९. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. ईएनव्ही-२०१०/प्र.क्र.१०६/ता.क. ३ दि. ०३.०५.२०११ अन्वये दिलेल्या निर्देशांप्रमाणे सार्वजनिक उत्सव साजरे करणारी अर्जदार संस्थेकडून सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

२०. उक्त प्रकरणी प्राप्त परवानगी प्रत, संबंधित अर्जदार संस्थेने मंडपाच्या दर्शनी भागावर नागरिकांच्या माहितीसाठी दर्शवावी.

२१. वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास संबंधीत अर्जदार संस्थेची अनामत रक्कम जप्त केली जाईल व संबंधित तात्पुरत्या मंडप व इतर बांधकामाची परवानगी रद्द होईल.

२२. सहाय्यक आयुक्त उक्त परवानगी कोणत्याही वेळी, कोणतेही कारण त्याबाबत न देता रद्द करण्याचा स्वेच्छाधिकार अबाधित ठेवत आहे.

**३. वाहतूक /पादचारी (चलनवलन) व्यवस्था :**

रस्त्यावर मंडप किंवा इतर तात्पुरत्या स्वरुपाच्या बांधकामांना परवानगी देताना पुरेसा योग्य तो रस्ता वाहनांना व पादचाऱ्यांना उपलब्ध आहे या बाबतची खबरदारी घेणे आवश्यक आहे. जर पुरेसा योग्य तो रस्ता उपलब्ध नसेल तर वाहनांना व पादचाऱ्यांना चलनवलनामध्ये अडथळा होणार नाही असा पर्यायी योग्य तो रस्ता उपलब्ध करुन दिला गेला पाहिजे.

परवानगीमध्ये सदर पर्यायी जागेवर पुरेसे व तपशीलवार फलक, दिशादर्शक लावण्याची अट असावयास हवी, जेणेकरुन तिथे मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी होणार नाही व मोठया प्रमाणात पादचाऱ्यांच्या चलनवलनाला अडथळा होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

रेल्वे स्टेशन, सार्वजनिक बस स्टॅण्ड, रिक्षा / टॅक्सी स्टॅण्ड, मोठी हॉस्पिटले, शैक्षणिक संस्था, इ. ठिकाणी बहुतांशी रस्ते हे दाटीवाटीचे असतात. सदर क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात वाहनांची व पादाचाऱ्यांची रस्त्यावर वर्दळ असते. सार्वजनिक सण, समारंभाकरिता रेल्वे स्टेशन, बस स्टॅण्ड, शाळा, हॉस्पिटल येथे रस्त्यांवर मंडपासाठी परवानगी देताना वाहनांच्या व पादचाऱ्यांच्या सुरळीत वर्दळीसाठी पुरेशी जागा उपलब्ध ठेवावी.

वाहनांची व पादचाऱ्यांची सुरळीत वर्दळ राहिल यापध्दतीने रस्त्यावर मंडप उभारण्यासाठी परवानगी दयावी किंवा योग्य व सोईचा पर्यायी मार्ग उपलब्ध करुन दयावा.

वाहनांच्या व पादाचाऱ्यांच्या सुरळीत वर्दळीसाठी पुरविलेल्या पर्यायी मार्गाची माहिती मंडपाच्या दर्शनी भागात दर्शवावी.

मंडपाने किंवा इतर तात्पुरत्या स्वरुपातल्या बांधकामामुळे व संरचनेमुळे रेल्वे स्टेशन, बस स्टॅण्ड इत्यादींच्या प्रवेशद्वाराजवळ अडथळा निर्माण करता कामा नये. तसेच पादचारी पुलाच्या जिन्याजवळ किंवा उतरण्याच्या जागेजवळ त्यांची उभारणी असता कामा नये. रेल्वे स्थानकामधून व बस स्थानकांमधून येणाऱ्या - जाणाऱ्या वाहनांची व पादचा-यांची सुरळीत वर्दळ राहण्याची दक्षता घेतली गेली पाहिजे. हॉस्पिटलमधून जाण्या-येणाऱ्या ॲम्बुलन्ससाठी पुरेशी मोकळी जागा ठेवावयास हवी.

४. वाहन वाहतूकीचा दर्शनिय आराखडा

१. वाहने व पादचाऱ्यांची सुरळीत वर्दळ होण्यासाठी आवश्यक असलेला नकाशा सर्व तपशीलांसह मंडपाच्या दर्शनी भागावर नागरिकांच्या माहितीसाठी प्रदर्शित केलेला असावा.

२. प्रत्येक अर्जदार संस्थेकडे गर्दीचे नियोजन करण्याचा आराखडा असणे गरजेचे असून सदर आराखडा मंडपाच्या दर्शनी भागावर प्रदर्शित केलेला असावा.

**५. तक्रार निवारण प्रणाली**

प्रत्येक अर्जदार संस्थेने, विविध नागरी सुविधा आणि ध्वनी प्रदूषण, आरोग्य संबंधित तक्रारी, सुरक्षा, इतर विविध प्रकारचे उपद्रव यासाठी सक्षम प्राधीकरणाचे दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक मंडपावर दर्शनी भागात प्रदर्शित करावे.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय दिनांक २१ एप्रिल २००९ अन्वये ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राधीकरणाची नियुक्ती केलेली आहे. त्याअन्वये तयार केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित अर्जदार संस्थेस बंधनकारक राहिल.

प्रत्येक प्रभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी तक्रार नोंदणी अधिकारी नामनिर्देशित करावा, ज्याच्याकडे नागरीक मंडपामुळे होणारा त्रास व वाहतुकीची समस्या याबाबत तक्रार देऊ शकतील. संबंधित सक्षम प्राधिकरणाने त्वरीत तक्रारींचे निराकरण करण्याबाबत कार्यवाही करावी. प्रत्येक प्रभागामध्ये सहाय्यक आयुक्तांनी तक्रार नोंदवही ठेवावी, ज्यामध्ये दूरध्वनीवरुन अथवा लिखित स्वरुपातील प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींची नोंद खालील नमूद तक्त्याप्रमाणे करावी.

## तक्रार नोंदवहीचा नमुना

| अ.क्र. | तक्रारीची दिनांक व वेळ | तक्रारदाराचे नाव, पत्ता व संपर्क क्रमांक | तक्रारींचा तपशील | तक्रार प्राप्त झाल्यानंतर केलेली कृती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ३. | ४. | ५. | ६. |
| | | | | | |
| | | | | | |

नियमितपणे सदर तक्रार नोंदवहीचे परीक्षण सहाय्यक आयुक्तांनी काटेकोरपणे करावे. सहाय्यक आयुक्त व संबंधित सक्षम प्राधिकरण हे सदर तक्रार निवारण करण्याबाबत त्वरीत कार्यवाही होईल याबाबत दक्षता घेतील.

अर्जदाराने संबंधित सहाय्यक आयुक्त व तक्रार अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक व ई-मेल मंडपाच्या दर्शनी भागावर नागरिकांच्या माहितीसाठी प्रदर्शित करावे.

ध्वनी प्रदूषणासंबंधीत आणि वाहतूक समस्यांबाबतीतल्या प्राप्त तक्रारी उक्त कारवाईसाठी सक्षम प्राधिकरणाकडे त्वरीत अग्रेषित कराव्या. ध्वनी प्रदूषणासंबंधी प्राप्त तक्रार संबंधित पोलीस स्टेशन व पोलीस कंट्रोल रुमला त्वरीत अग्रेषित करावी. तसेच नागरिकांना तक्रारी दाखल करण्यासाठी खालील टोल फ्री क्रमांक, ई-मेल, SMS सुविधा क्रमांक संबंधित अर्जदाराने मंडपाच्या दर्शनी भागावर प्रदर्शित करावा.

**टोल फ्री नंबर : १८०० २२२ १०८**

**ई-मेल : rdmc@thanecity.gov.in**

**SMS सुविधा - ७५०६९४६१५५**

रेल्वे स्टेशन, बस स्टॅण्ड, रिक्षा/टॅक्सी स्टॅण्ड, शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल, इ. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पादचाऱ्यांची, वाहनांची वर्दळ असल्याने सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपातल्या मंडप व इतर बांधकामांना परवानगी देताना प्रभागाचे सहाय्यक आयुक्त हे पादचारी, वाहने यांच्या वर्दळीसाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे याबाबत दक्षता घेतील.

सार्वजनिक उत्सव व समारंभाच्या वेळी रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात येणारे मंडप व इतर बांधकामे यांना परवानगी देण्याबाबत तयार करण्यात आलेल्या धोरणास मा. महासभेद्वारे मंजुरी देण्यात येत आहे. तरी प्रशासनाने पुढे योग्य ती कारवाई करावी.

सुचक : ॲड. अनिता सुनिल गौरी

अनुमोदक : संजय वाघुले

बहुमताने मंजूर

महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रत :- मा. आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर.